| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHOS010023402021 | दाखल दिनांक | - | १२.११.२०२१ | | |
| | नोंदणी दिनांक | - | १६.११.२०२१ | | |
| | निकाल दिनांक | - | २२.०७.२०२६ | | |
| | कालावधी | | वर्षे | महिने | दिवस |
| | एकूण - | | ०४ | ०८ | १० |

जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धाराशिव
यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी अ.सि.आवटे)

फौजदारी पुनर्निरीक्षण अर्ज क्र.२४/२०२१
निशाणी क्र.२३

भिम कल्लाप्पा कुंभार
वय ४६ वर्षे, धंदा–व्यापार
रा.एकलव्य आश्रमशाळा
मंगरुळ (यमगरवाडी), ...याचिकाकर्ता.
ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. महाराष्ट्र शासन
द्वारा– जिल्हा सरकारी वकील
उस्मानाबाद.

२. अविनाश पार्श्वनाथ गडदे
वय ४० वर्षे, धंदा–व्यापार, ...उत्तरार्थी.
रा. प्लॅट नं.१०१, गणेश अपार्टमेंट,
ग्रीनलॅन्ड स्कुलसमोर, आनंदनगर,
ता.जि.उस्मानाबाद.

३. प्रताप राजेंद्र गायकवाड
वय ३५ वर्षे, धंदा–व्यापार,
रा. समर्थनगर, ता.जि.उस्मानाबाद.

४. शोभा सुभाष तामने
वय ४८ वर्षे, धंदा–नोकरी,
रा.न्यु शॉपींग सेंटर, सेंटर गव्हर्नमेंट स्टाफ
क्वाटर्स, सेक्टर–७, एंटोप हिल,
मुंबई ४०००३७.

५. मुकेश कुमार
वय ५० वर्षे, धंदा–नोकरी,
रा. पुष्पा भवन, मदनगिरी रोड, ...उत्तरार्थी.
लालबहाद्युर शास्त्री मार्ग, जहापनाह सिटी
फॉरेस्ट, नवी दिल्ली ११००६२.

६. शाखाधिकारी
आदर्श महिला नागरी सह.पतसंस्था मर्या.
उस्मानाबाद, पवार कॉम्प्लेक्स गाळा नं.१०,
तुळजाभवानी स्टेडीयम स्विमींग टँकच्या मागे,
न्यायाधिश निवासस्थानासमोर, उस्मानाबाद
ता.जि.उस्मानाबाद.

****

| | | |
|---|---|---|
| याचिकाकर्ता करिता | – | विधीज्ञ आर.एस.कुलकर्णी |
| उत्तरार्थी क्र.१ करिता | – | सहाय्यक सरकारी वकील एम.बी.देशमुख |
| उत्तरार्थी क्र.२ करिता | – | विधीज्ञ श्री.ए.एच.घोगरे |
| उत्तरार्थी क्र.३ करिता | – | विधीज्ञ श्री.एम.ए.शहाणे |
| उत्तरार्थी क्र.४ व ५ करिता | – | विधीज्ञ श्री.आय.ए.पठाण |
| उत्तरार्थी क्र.६ करिता | – | विधीज्ञ श्री.के.एच.चौरे |

## न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक २२ जुलै, २०२६)

१. प्रस्तुतचा पुनर्निरीक्षण अर्ज मुळ आरोपी क्र.२ याने दाखल केला आहे. या अर्जाद्वारे आरोपी क्र.२ याने न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, उस्मानाबाद यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६२२/२०२० मध्ये दिनांक १५.०२.२०२१ रोजी पारित केलेला आदेश आव्हानीत केला आहे. या आदेशान्वये न्यायदंडाधिकारी यांनी आरोपी क्र.१ ते ५ यांचे विरुध्द भा.द.वि.कलम १२०(ब),४२०,४६५,४६७, ४६८,४७१ सह ३४ अन्वये आदेशिका काढली आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

२. या पुनर्निरीक्षण अर्जातील सामनेवाला क्र.२ हा मुळ फिर्यादी आहे. प्रस्तुत अर्जातील अर्जदार हा मुळ प्रकरणामध्ये आरोपी क्र.२ आहे. प्रस्तुत सामनेवाला क्र.३ ते ६ मुळ प्रकरणामध्ये आरोपी क्र.१ व ३ ते ५ आहेत. या आदेशामध्ये सोयीकरीता मी चौकशी न्यायालयासमोर दाखल झालेल्या प्रकरणातील पक्षकारांच्या स्थानाप्रमाणे वर्णन केले आहे.

३. फिर्यादीचे कथन थोडक्यात असे आहे की, तो ''अविज टेक्नोवेज'' या नावाने उस्मानाबाद येथे व्यवसाय करत आहे. शासकीय कार्यालयांना आवश्यक असणारी यंत्रसामग्री पुरवण्याचा व्यवसाय तो करतो. सन २०१३ ते सन २०१६ या कालावधीमध्ये त्याने केंद्रीय भांडार मुंबई यांचे मार्फत जिल्हाधिकारी उस्मानाबाद व त्यांचे अधिपत्याखालील इतर कार्यालयांमध्ये कागदपत्रांचे स्कॅनिंग केले आहे. तसेच कॉम्पॅक्टर पुरवठा करण्याचे काम केले आहे. स्कॅनिंगच्या कामाची एकूण किंमत रु.९९,९९,०७०/- होती आणि कॉम्पॅक्टर पुरवठा करण्याच्या कामाची

एकूण किंमत रु.१,३९,००,०००/–होती. फिर्यादीने केलेल्या कामाचे ९० टक्के बील त्याला मिळालेले आहे. परंतु उर्वरीत १० टक्के बील त्याला मिळालेले नाही. याबाबत त्याने चौकशी केली असता त्याला असे समजले की आरोपी क्र.१ ते ५ यांनी संगनमताने बनावट कागदपत्रे तयार करुन त्याची रक्कम हडप केली आहे. आरोपी क्र.१ ते ४ यांनी आपसात संगनमत करुन बनावट अधिकारपत्र तयार केले आणि त्या आधारे जिल्हाधिकारी कार्यालयातून ३ वगेवेगळ्या धनादेशाद्वारे रक्कम उचल केली आहे. आरोपी क्र.२ यास केंद्रीय भांडार प्रोपरायटर असे खोटे दर्शवले आहे. आरोपींनी संगनमत करुन आरोपी क्र.५ या पतसंस्थेमध्ये बनावट खाते उघडले व केंद्रीय भांडार मुंबई मार्फत जिल्हाधिकारी नांदेड येथे दाखल करण्यासाठी देण्यात आलेले अधिकारपत्र प्राप्त करुन त्यामध्ये खाडाखोड करुन त्या पत्रामध्ये आरोपी क्र.२ च्या नावाचा उल्लेख केला आणि रकमेची उचल केली आहे. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की आरोपी क्र.१ ते ५ यांनी संगनमत करुन बनावट कागदपत्रे तयार केली आणि त्या आधारे रु.२३,८९,९०७/– रकमेचा अपहार केला आहे.

४. चौकशी न्यायालयाने फिर्यादीने सादर केलेल्या पुराव्यांचा विचार करुन सर्व आरोपीविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे आदेशिका काढण्याचा आदेश केला आहे. तो आदेश या अर्जदाराने (मुळ आरोपी क्र.२)याने आव्हानीत केला आहे.

५. मुळ आरोपी क्र.२ चे वकीलांनी नि.क्र.१९ येथे लेखी युक्तीवाद सादर केला आहे. फिर्यादी व त्याचे वकील या अर्जाच्या युक्तीवादावेळी गैरहजर होते.

६. पुनर्निरीक्षण अर्ज निकाली काढण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. या मुद्यांना माझी उत्तरे आणि त्याची कारणे मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | चौकशी न्यायालयाने दिनांक १५.०२.२०२१ रोजी फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६२२/२०२० या प्रकरणामध्ये पारित केलेला आदेश मुलतः बेकायदेशीर आहे ही बाब पुनर्निरीक्षण अर्जदार/ मुळ आरोपी क्र.२ याने शाबीत केली आहे का ? | नाही. |
| २. | अंतिम आदेश ? | पुनर्निरीक्षण अर्ज खर्चासह फेटाळला आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करिता –**

७. लेखी युक्तीवादाच्या परिच्छेद क्र.४ मध्ये आरोपी क्र.२ च्या वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की फिर्यादीने यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये तक्रार केली होती आणि या तक्रारीची चौकशी करण्यात आली होती. या चौकशीमध्ये दोन्ही बाजूंना लेखी म्हणणे आणि खुलासा दाखल करण्याची संधी दिली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणामध्ये कोणताही अपहार झाला नाही असा निर्णय दिला आहे. त्यामुळे मुळ आरोपी क्र.२ याने कोणताही गुन्हा केलेला नाही.

८. फिर्यादीने फिर्यादच्या परिच्छेद क्र.५ मध्ये असे कथन केले आहे की अपहार झालेल्या घटनेबाबत त्याने जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचेकडे तक्रार केली होती. परंतु जिल्हाधिकारी यांनी त्याने सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार न करता चुकीचा निर्णय देवून सदर प्रकरण बंद केले आहे.

९. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे समोर दाखल झालेल्या प्रकरणातील कागदपत्रे या न्यायालयासमोर दाखल करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे केवळ फिर्यादीने चौकशी न्यायालयासमोर दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार करावा लागेल. चौकशी न्यायालयाने फिर्यादीने सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन करुन तसेच संबंधीत कायदेशीर तरतुदींचे अवलोकन करुन वादातील आदेश पारीत केलेला आहे. त्यामुळे आरोपी क्र.२ च्या वकीलांचा युक्तीवाद मान्य करता येणार नाही.

१०. आरोपीच्या वकीलांनी पुनर्निरीक्षण अर्ज क्र.९/२०२२ मधील माझ्या पुर्वाधिका–यांनी पारीत केलेला निर्णय सादर केला आहे. या निर्णयाचे अवलोकन करता असे दिसून येते की माझ्या पुर्वाधिका–यांनी आरोपी क्र.४ मुकेश कुमार याचे विरुध्द चौकशी न्यायालयाने पारीत केलेला आदेशिका काढण्याचा आदेश रद्दबातल केला आहे.

११. माझ्या मते या निर्णयाचा आधार आरोपी क्र.२ यास घेता येणार नाही कारण माझ्या मते मुळ आरोपी क्र.४ याचे विरुध्द फिर्यादीने केलेले आरोप आणि त्याचे विरुध्दचा पुरावा विचारात घेवून हा आदेश पारीत केला आहे. पुनर्निरीक्षण अर्ज क्र.१०/२०२२ मध्ये माझ्या पुर्वाधिका–यांनी मुळ आरोपी क्र.३ शोभा तामने हिने सादर केलेला पुनर्निरीक्षण अर्ज मात्र नामंजूर केला आहे. म्हणजेच ज्या आरोपी विरुध्द सकृतदर्शनी पुरावा आहे त्या आरोपीचा पुनर्निरीक्षण अर्ज माझ्या पुर्वाधिका–यांनी नामंजूर केला आहे.

१२. उपलब्ध कागदपत्रांवरुन मी असा निष्कर्ष काढला आहे की चौकशी न्यायालयाने आरोपी क्र.२ याचे विरुध्द पारीत केलेला आदेश योग्य व कायदेशीर आहे. या आदेशामध्ये कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करण्याची गरज नाही. म्हणून मुद्या

क्र.१ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविले आहे.

**मुद्दा क्रमांक २ करिता –**

१३. वरील विवेचणावरुन हे स्पष्ट होते की, प्रस्तुतचा पुनर्निरिक्षण अर्ज मंजूर होणेस पात्र नाही. या निष्कर्षावरुन मी खालील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करतो.

## आदेश

पुनर्निरीक्षण अर्ज खर्चासह फेटाळण्यात येतो.

Digitally signed by ANANT SIDDHESHWAR AWATE
Date: 2026.07.22 17:45:09 +0530

दिनांक – २२.०७.२०२६ (अ. सि. आवटे)

जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश,धाराशिव.

<u>CERTIFICATE</u>

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/ order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M. K. Shinde<br>Stenographer (Grade-I) |
| Court | : | District Court-2 & Addl. Sessions Court, Osmanabad. |
| Date | : | 22.07.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 22.07.2026 |
| Order uploaded on | : | 22.07.2026 |